# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

**शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१२/६(फ)/प्र.क्र.९४(न)/१२/नवि-९,**

**दि. ६ सप्टेंबर, २०१४**

**पहा –** १) शासन निर्णय क्र.टिपीएस-२४९१/१८३५/प्र.क्र.८६/९१/नवि-९, दि. १५.१०.२००३
२) शासन निर्णय क्र.टिपीएस-२४९१/१८३५/प्र.क्र.८६अ/९१/नवि-९, दि. १६.१२.२००४.
३) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र. मनपाना/नरवि/हेरिटेज/२३२८, दि. १०.११.२००४.
४) शासन निर्णय क्र. टिपीएस-२४९१/१८३५/प्र.क्र.८६अ/९१/नवि-९, दि. ८.४.२००५.
५) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र. मनपाना/नरवि/२६६, दि. ८ जून, २०१२.
६) शासन निर्णय क्र. टिपीएस-२००८/नाशिका-५२८/प्र.क्र.१४/०९/नवि-९, दि. ३ जुलै, २०१०.

**प्रस्तावना -** नागपूर शहरातील ऐतिहासिक व वास्तुशास्त्रीय दृष्टया महत्वाच्या इमारती / परिसर जतनाबाबत संदर्भ क्र. (१) च्या शासन निर्णयान्वये नागपूर शहर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र. ३४ अंतर्भूत करण्यात आला आहे. या नियमावलीतील नियम क्र. १३ नुसार नागपूर शहरासाठी "हेरिटेज संवर्धन समिती" स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेने संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये "हेरिटेज संवर्धन समित"" स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयान्वये नागपूर शहरासाठी "हेरिटेज संवर्धन समिती" ची स्थापना करण्यात आली होती.

नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३४ नियम १३.२.१ नुसार उक्त हेरिटेज संबंधीत समितीमधील गट (१), (३), (४), (६) व (७) मधील सदस्यांचा तीन वर्षाचा कालावधी दि. १३ जरनेवारी, २०१२ रोजी संपुष्टात आला आहे. यास्तव या गटातील सदस्यांची नव्याने नियुक्ती करण्याचा प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेने संदर्भ क्र. (५) अन्वये शासनास सादर केला असून या अनुषंगाने "हेरिटेज संवर्धन समिती"वर सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात विचारांती शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-** नागपूर शहरातील ऐतिहासिक व वास्तुशास्त्रीयदृष्टया महत्वाच्या इमारती व परिसर जतनासाठी संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयान्वये अधिसूचित हेरिटेज नियमावलीतील नियम क्र. १३ नुसार, नागपूर हेरिटेज संवर्धन समितीवर, शासन या निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे सदस्यांची नियुक्ती करीत आहे :-

| अनु. क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. अरुण पाटणकर, निवृत्त भा.प्र.से. / निवृत्त सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर. | सदस्य |
| ३ | श्री. पी.एस.पाटणकर, एम.टेक (स्ट्रक्चर्स), नागपूर. | सदस्य |
| ४ | श्री. हबीब खान, वास्तुविशारद व संचालक प्रियदर्शनी व लोकमान्य टिळक इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्चर ॲण्ड | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | डिजाइन स्टडीज, नागपूर. | |
| ५ | डॉ. श्रीमती उज्वला शिरीष चक्रदेव, एल. ए. डी. महाविद्यालय, नागपूर | सदस्य |
| ६ | क्यूरेटर, नागपूर वस्तु संग्रहालय, नागपूर. | सदस्य |
| ७ | डॉ. तपन चक्रवर्ती, नीरी, नागपूर. | सदस्य |
| ८ | श्रीमती शुभा जोहरी, प्र. पाठक इतिहास विभाग नागपूर विद्यालय, नागपूर. | सदस्य |
| ९ | सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर | सदस्य |
| १० | सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडून नामनिर्देशित | सदस्य |
| ११ | सहायक संचालक नगररचना, नागपूर महानगरपालिका, नागपूर. | सदस्य सचिव |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA MUMBAI-32

( संजय वं. बारई )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

*(Desk Heritage)*